**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

महापालिका सचिव कार्यालय,

दिांक :- १७/०७/२०१४

**मा. विशेष सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**

**सभा क्रमांक ०७ दिनांक १७/०७/२०१४**

**सभा सूचना क्रमांक ०३ दनांक ०५/०७/२०१४**

**सभा क्रमांक ०३ दिनांक १७/०७/२०१४**

ठाणे महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १५/०७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०३ दिनांक ०५/०७/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती. परंतू सदर दिवशी सभा खंडीत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक १७/०७/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे .

**१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील- महापौर**

**२) श्री. मुकेश मधुकर मोकशी-उपमहापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | मिलिंद माधव पाटणकर | 4 | नरेश रतन मणेरा |
| 5 | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | 6 | डुंबरे मनोहर जयसिंग |
| 7 | स्नेहा अंकुश पाटील | 8 | उज्वला रामचंद्र फडतरे |
| 9 | उषा संजय भोईर | 10 | मधुकर रामचंद्र पावशे |
| 11 | आशादेवी शेरबहादूर सिंह | 12 | भोईर संजय देवराम |
| 13 | चव्हाण सुधाकर वामन | 14 | चव्हाण तेजस्विनी किरण |
| 15 | इंदिसे रेखाबाई मिनानाथ | 16 | वाव्हळ सुभाष सिताराम |
| 17 | प्राजक्ता प्रदिप खाडे | 18 | संभाजी धोंडिराम पंडीत |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | सुशिला संकटाप्रसाद यादव | 20 | राधा फत्तेबहादूर सिंह |
| 21 | सरैय्या अमित जयसिंग | 22 | चिंदरकर कांचन विजय |
| 23 | जगदाळे हनुमंत ज्ञानु | 24 | जाधवर राधाबाई सुभाष |
| 25 | पालांडे दशरथ बाबुराव | 26 | पाटील वर्षा वसंत |
| 27 | पाटील शारदा विजय | 28 | भोईर विमल अर्जून |
| 29 | लासे विजया मनोज | 30 | पाटील कल्पना हरिश्चंद्र |
| 31 | पाटील उमेश काशिनाथ | 32 | साप्ते राजेंद्र रमेश |
| 33 | एगडे रामचंद्र हरी | 34 | गौरी अनिता सुनील |
| 35 | नंदिनी राजन विचारे | 36 | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| 37 | वडवले संतोष वसंत | 38 | महेश्वरी संजय तरे |
| 39 | आशा बाबासाहेब कांबळे | 40 | नंदा कृष्णा पाटील |
| 41 | संगिता माणिक पाटील | 42 | मंदार प्रमोद विचारे |
| 43 | घाडीगांवकर संजय पांडुरंग | 44 | कणसे निर्मला शरद |
| 45 | खताळ विशाखा मधुकर | 46 | बोरीटकर प्रभा अशोक |
| 47 | फाटक जयश्री रविंद्र | 48 | भोईर एकता एकनाथ |
| 49 | जगताप अश्विनी अशोक | 50 | जितेंद्र प्रभाकर वाघ |
| 51 | भोसले नम्रता दिपक | 52 | शिंदे मनोज तुकाराम |
| 53 | हिराकांत बेंडू फर्डे | 54 | काशिराम गोविंद राऊत |
| 55 | मोरे रुचिता राजेश | 56 | मोरे संध्या सुनिल |
| 57 | सोनार सारिका संजय | 58 | जानकर योगेश तातोबा |
| 59 | महेश सुरेश वाघ | 60 | फाटक रविंद्र सदानंद |
| 61 | मेघना सुनिल हंडोरे | 62 | मोरे संजय भाऊराव |
| 63 | लोखंडे सुहासिनी सुनिल | 64 | संखे मिनल मुकूंद |

| | | | |
|---|---|---|---|
| 65 | पाटील मालती रमाकांत | 66 | म्हस्के नरेश गणपत |
| 67 | रेखा भालचंद्र पाटील | 68 | पाटील सुजाता भास्कर |
| 69 | नाईक राजश्री सुनिल | 70 | नारायण शंकर पवार |
| 71 | ठाकुर अक्षय अनंत | 72 | कोकाटे सुधीर विष्णु |
| 73 | किणे राजन नारायण | 74 | वाघ पुजा गणेश |
| 75 | मिरजा जमेला तबस्सूम इनायत बेग | 76 | वहिदा मुस्तफा खान |
| 77 | आशरीन इब्राहीम राऊत | 78 | साळवी मनोहर रामा |
| 79 | शेख रजिया इकबाल | 80 | सामंत विलास शिवराम |
| 81 | संजय संतू वाघुले | 82 | राजे गिरीश अनंत |
| 83 | काकडे बालाजी दगडू | 84 | कुरेशी यासीन अय्युब |
| 85 | विश्वनाथ भगत | 86 | भगत सुधीर रामचंद्र |
| 87 | पाटील रेश्मा रमेश | 88 | पठाण अशरफ उस्तान |
| 89 | अफिजा नसीरुद्दीन नाईक | 90 | खान मिराज नईम |
| 91 | डोंगरे सिराज महम्मद अली | 92 | हिरा सिताराम पाटील |

गैरहजर सदस्य खालीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | आरज प्रगती भारत | 2. | मढवी बिंदू महेंद्र |
| 3. | पुर्णेकर जयनाथ यशवंत | 4. | विलास चंदू कांबळे |
| 5. | सरनाईक परिषा प्रताप | 6. | राजकुमार रामनयन यादव |
| 7. | सरनाईक विहंग प्रताप | 8. | चव्हाण विक्रांत भिमसेन |
| 9. | पांडे संजय श्रीनाथ | 10. | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर |
| 11. | वैती अशोक बारकू | 12. | देसाई सुहास सुर्यकांत |
| 13. | तायडे रामभाऊ महादेव | 14. | शान मनप्रीत गुरमकसिंग |
| 15. | वेतकर दिपक विजय | 16. | नजीब सुलेमान मुल्ला |

**श्री.सुहास देसाई :-**

मा.महापौर महोदय, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.आयुक्त महोदय, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते आणि सभागृहातील सर्व सन्मा.सदस्य ठाणे महानगरपालिकेचा सन २०१३-१४ चा सुधारीत व सन २०१४-१५ चा मूळ अर्थसंकल्प सभागृहात सादर झालेला आहे. त्या अनुषंगाने मी बोलत आहे. मा.सभापती श्री.सुधाकर वामन चव्हाण हयांनी म्हणजेच आमच्या भाईंनी या ठिकाणी अर्थसंकल्प मांडला आहे त्याबाबत मा.सभापती व सर्व सदस्यांचे मी सर्वप्रथम आभार मानतो.

आजच्या या अर्थसंकल्पावर बोलत असतांना उत्पन्नाचे जे स्त्रोत आहेत त्यावर बोलणे आवश्यक आहे असे मला वाटते. उगाच अर्थसंकल्प सुजविला आहे, फुगविला आहे असे बोलण्यापेक्षा उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे आवश्यक आहे. तरी त्या विषयी काही सूचना मी या ठिकाणी करीत आहे.

मा.महापौर महोदय, मालमत्ता कर व पाणीपट्टी याची जी वसूली आहे ती पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. माझ्या प्रभागात ब-याचशा प्रमाणात स्लम एरिया आहे. त्या ठिकाणी नागरिकांना पाण्याची बीले व टॅक्सची बीले मिळत नाहीत. अनेक ठिकाणी ही बीले लागलेली नाहीत. केवळ माझ्याच नाही तर अनेक प्रभागामध्ये अशी परिस्थिती आहे की, ज्या ठिकाणी टॅक्स व पाण्याची बीले लागली तर वसूली फार मोठया प्रमाणात होऊ शकते.

ठाणे महानगरपालिकेचा उत्पन्नाचे फार मोठे स्त्रोत शहर विकास विभाग हे आहे. शहर विकास विभागाकडील अर्ज छाननी प्रक्रिया योग्य नियमाने केल्यास उत्पन्नात वाढ होईल.

पार्किंग धोरणाची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या ज्या वास्तू वर्षानुवर्षे अशाच पडून आहेत त्या भाडयाने देणे, तरण तलाव, शैक्षणिक भूखंड भाडयाने देणे, कैक ठिकाणी दुकानांचे गाळे पडिक अवस्थेत आहेत. त्याच्यात सूसुत्रता राखली तर उत्पन्नात वाढ होऊ शकते. LBT बाबत ठोस निर्णय शासन दरबारी झालेला नसतांनाही राजकीय पोटतिडकीतून उत्पन्नाची घट झालेली दिसून येत आहे. तरी नविन करप्रणाली येईपर्यंत LBT वर लक्ष केंद्रीत करणे सोईचे ठरेल. परिवहन सेवेबाबत मला असे बोलायचे आहे की, वर्षानुवर्षे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करुन देखिल महानगरपालिका लोकहितार्थ परिवहन सेवेचा डोलारा सांभाळत आहे. तरी देखिल शहरातील लोकांना आपण योग्य त्या सुविधा देऊ शकत नाही. तरी माझे वैयक्तिक मत असे आहे की, परिवहन सेवा ही बेस्टला सोपविण्यांत यावी. कालच्या वर्तमानपत्रात बातमी देखिल आली होती की, ते घ्यायला देखिल तयार आहेत.

त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. आणि त्याबाबतीत आपण सर्वांनी ठोस निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता गरज वाटल्यास मा.श्री.जितेंद्र आव्हाड वैद्यकिय शिक्षण मंत्री यांचेशी चर्चा करुन हा प्रश्न सोडविला जाऊ शकतो.
तसेच ठाणे शहराची शासन असलेले अद्ययावत दादोजी कोंडदेव स्टेडियम, या स्टेडियमवर रणजी सारखे किंवा राज्यस्तरीय सामने खेळविले तर आपल्याला उत्पन्न होऊ शकते. पण त्या बाबतीत कोणी काही हालचाल करीत नाही. मा.महापौर महोदय, अर्थसंकल्पावर भाष्य करीत असतांना मी प्रतिनिधीत्व करीत असलेल्या राबोडी विभागाकरिता मी काही मागणी केली नाही तर मला वाटते की ते चुकीचे ठरेल. मागच्या अर्थसंकल्पात देखिल मी मागणी केली होती.परंतू मला ती मिळाली नाही, मा.महापौर महोदय मी पुन:श्च एकदा मागणी करतो.

माझा राबोडी हा जो प्रभाग आहे तो मध्यवस्तीचा आहे. ठाणे शहरातून जवळ असलेला आणि हार्ट ऑफ सिटी असा भाग असतांना अर्थसंकल्पात तरतूद करीत असतांना माझ्या प्रभागाकडे दुर्लक्ष केले जाते असा माझा वैयक्तिक आरोप आहे. मा.महापौर महोदय, मागील अर्थसंकल्पाचे वेळेस पंचगंगा ते कलावती मंदिर तसेच साकेत पर्यंत असलेला नाला आरसीसी पध्दतीने करुन देण्यांत यावा अशा प्रकारचा प्रस्ताव ठेवला होता. तीच मागणी मी या ठिकाणी करीत आहे. पावसाळा सुरु झाल्यानंतर खाडीला भरती आल्यावर हा नाला भरला जातो आणि ते पाणी जमिनीत मुरते. या ठिकाणी ग्राऊंड फ्लोअरला रहाणा-या लोकांच्या घरांच्या जमिनीच्या लादयांतून हे पाणी वरती यायला लागते. तरी मी आशा बाळगतो की माझ्या प्रभागातील हया मागणीकडे आपण काळजीपूर्वक लक्ष दयाल.

तसेच पंचगंगा ते रुस्तमजी हया डिपी रोडची आमच्या प्रभागातील नागरिकांची मागणी आहे. त्याचप्रमाणे क्रांतीनगर नाल्यावरील ब्रीज हा मागील २५ वर्षांपासून अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये आहे. त्याच्या बाजूलाच सरस्वती शाळा असल्यामुळे त्या ठिकाणी मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांची व पालकांची

गर्दी असते. अत्यंत वाईट अवस्थेत हा ब्रीज आहे. सदर ब्रीज नव्याने बांधण्यांत यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

मा.महापौर महोदय, माझी वैयक्तिक अपेक्षा अशी आहे की , मी विनंती केलेल्या कामांमध्ये आपण व्यक्तिगतरित्या लक्ष घालून सदरच्या कामांचा व मी केलेल्या सूचनांचा अर्थसंकल्पात अंतर्भाव करावा व तरतूद करावी ही विनंती.

या ठिकाणी अर्थसंकल्पाच्या भाषणावर मला माझे मत व्यक्त करण्याकरिता आपण संधी दिली त्याबाबत मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.आयुक्त सो., मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते आणि सभागृहातील सर्व सन्मा.सदस्य यांचे मी आभार मानतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

**सौ.आशा कांबळे :**

मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त सो.,मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय गटनेते आणि सभागृहातील सर्व सन्मा.सदस्य या ठिकाणी सन २०१४-१५ च्या २३९५ कोटींच्या बजेटला मंजूरी देत असतांना मला या ठिकाणी असे सांगायचे आहे की असे म्हटले जाते की, न बोलणाऱ्याचे गहू सुध्दा विकले जात नाहीत पण बोलणाऱ्याची माती सुध्दा विकली जाते. माझा बोलण्याचा उद्देश असा आहे की, हे जे बजेट आहे हे मंजूर होणारच आहे. तथापी हे बजेट मंजूर करीत असतांना प्रत्येक नगरसेवकांना त्यांच्या हक्काचा जो काही नगरसेवक निधी आहे तो देण्यांत यावा. कारण कालच सभागृहात चर्चा करीत असतांना, सन्मा.सदस्या सौ.महेश्वरी तरे ताई हयांनी देखिल या ठिकाणी बजेट पास करण्याच्या संदर्भात यादीचा उल्लेख केलेला आहे. तरी अशा प्रकारे यादी वगैरे तयार न करता प्रत्येक नगरसेवकांना त्यांचे अधिकार देण्यांत यावेत.

तसेच मला याठिकाणी एक विशेष सूचना कराविशी वाटते की, आयुक्त सो., आणि मा.महापौर महोदय आपण स्वत: देखिल माझ्या प्रभागातील आरोग्य केंद्राला भेट देणार होतात. आणि त्या ठिकाणी पहाणी करुन काहीतरी चर्चा करुन सोल्यूशन काढणार होतात. परंतू आपण सदर ठिकाणी भेट दिली नाहीत. या परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र प्रसुतीगृहासह बांधण्यांत यावे माझ्या प्रभागात पडवळ नगर वगळता अन्य ठिकाणी प्रसुतीगृह नाही. तरी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र प्रसुतीगृहासह बांधल्यास या परिसरातील गोरगरिब नागरिकांना त्याचा फार मोठया प्रमाणात लाभ मिळू शकेल. आणि त्याचबरोबर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

त्याचबरोबर कामगार हॉस्पिटल मधील बराच असा भाग रिकामा आहे. त्या ठिकाणचा एखादा मजला महानगरपालिकेने ताब्यात घेऊन त्या ठिकाणी रुग्णालय सुरु केल्यास त्यातून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते.

मा.महापौर महोदय, अर्थसंकल्पात नाल्यांची दुरुस्ती आणि पुनर्बांधणी या करिता तरतूद करण्यांत आलेली आहे. माझ्या प्रभागातून नाल्यांचा उगम होतो. या नाल्यातून पावसाच्या प्रवाहाबरोबर मोठमोठे दगड नाल्याबरोबर खाली येत असतात. आणि मोठे होण्याची शक्यता असते. तरी माझ्या प्रभागातील नाल्यांच्या बांधणीकरिता तरतूद करण्यांत यावी. वारंवार मागणी करुन सुध्दा या करिता जे बजेट उपलब्ध व्हायला पाहिजे ते प्रसंगी संपलेले असते. तरी या ठिकाणी माझी विनंती आहे की, माझ्या प्रभागातील नाल्यांकरीता तरतूद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे मा.महापौर महोदय, माझ्या प्रभागात अविकसीत गांव निधी आणि डोंगराळ भाग विकास निधींचा मागील दोन- तीन वर्षापासून उल्लेखच नाही. माझा प्रभाग तर अगदी मुंबईला लागून आहे. तरी देखिल जुना गांव बघितले तर अगदी गावात गेल्यासारखे वाटते. त्यामुळे मला अशी विनंती करावयाची आहे की, अविकसीत गांव निधी व डोंगराळ भाग विकास निधीचा अंतर्भाव करण्यांत यावा.

शिवाय पाण्यावरती आपण ७५ कोटी खर्च करीत आहोत. हा खर्च करीत असतांना पाणी बीला पोटी वसुली किती होत आहे, पाण्याची चोरी किती होत आहे याचा शोध लावून ज्या ठिकाणी अशा प्रकारे पाणी चोरी होत आहे त्यावर दंड आकारुन अभय योजना चालू करण्यांत यावी.

त्याचप्रमाणे परिवहन सेवेच्या बस फेऱ्यांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सकाळी सहा ते सात च्या सुमारास आमच्या परिसरात कधी कधी बसेस असतात. कधी कधी सातच्या नंतर बसेस असतात . त्यामुळे मुलांना शाळा कॉलेजला जाण्यास विलंब होतो. या करिता बसे फेऱ्यांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

मा.महापौर महोदय, या ठिकाणी अर्थसंकल्पावर बोलण्याकरिता आपण मला संधी दिली त्याबाबत मी आपले या ठिकाणी आभार मानते. धन्यवाद !

जय भिम, जय महाराष्ट्र !

**सौ.मिनल संखे :**

मा.महापौर महोदय, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय गटनेते, मा.आयुक्त व सर्व सन्मा.नगरसेवक व अधिकारी वर्ग.. ..

मा.सभापती, स्थायी समिती श्री.सुधाकर चव्हाण सो., यांनी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे सुधारीत व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजीत अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी प्रभाग सुधारणा निधीमध्ये प्रति सदस्य रु.४० लक्ष प्रमाणे रु.५२ कोटी तरतूद सुचविण्यांत आली आहे. तर नगरसेवक निधी प्रति सदस्य रु.२४ लक्ष उपलब्ध करण्यांत आलेला आहे. त्याबद्दल आपले मनापासून आभार. यामुळे आम्हा नगरसेवकांना आमच्या प्रभागात मुलभूत सोई-सुविधा देणे जास्त प्रमाणात देणे शक्य होणार आहे.

काल सन्मा.सदस्या सौ.महेश्वरी तरे ताई म्हणाल्या की नेहमी आयुक्त सो. आले की, नेहमी नविन स्वप्न दाखविली जातात. मग ती मेट्रो असो, मोनो रेल असो किंवा ट्रामचे स्वप्न असो अशी स्वप्न दाखविली जातात. पण ही स्वप्न काही साकार होत नाही. त्यांनी काल असे देखिल सांगितले होते की मागील वर्षी बजेटच्या भाषणाचे वेळी शेरोशायरी व कविता झाल्या होत्या परंतू या वर्षी काही होत नाही. तरी मी नक्कीच त्यांचा आदर ठेऊन एक कविता सादर करीत आहे.. ..

" स्वप्न ही अशीच असतात,खोटी आशा दाखवणारी,

वास्तवापासून नेहमीच आपल्याला दूर घेऊन जाणारी,

स्वप्नांच्या मोहक दुनियेत मन रमते, पण तुटलेल्या स्वप्नांमुळे नामजूक मन दुखवते,

म्हणूनच स्वप्ने पहावीत, पण क्षणिक आनंदासाठी,

आशा ठेऊ नये, ती पूर्ण होतीलच अशी,

शेवटी वास्तवाला जे शक्य नसते, तेच स्वप्नात आपण पहात असतो,

कधी ना कधी ती पूर्ण होतील याच आशेवर जगत असतो ! "

या वर्षीच्या अर्थसंकल्पाबाबत बोलतांना मी जास्तीत जास्त महापालिकेच्या उत्पन्नाच्या बाजूनेच बोलणार आहे. व माझ्या अनुभवावर आधारीत सूचना मांडणार आहे. तरी कृपया याचा विचार व्हावा, ही विनंती.

<u>फेरीवाला धोरण :</u>

राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ नुसार ठाणे महानगरपालिकेने शहर फेरीवाला समितीचे गठण केले आहे.

फेरीवाल्यांसाठी नोंदणी फी रु.१०००/-( रु.एक हजार मात्र) व दरमहा आकार रु.६००/- ठरविण्यांत आला आहे. अतिशय चांगला उपक्रम असून यामुळे वर्षानुवर्षे जे फरीवाले आपली रोजीरोटी कमवित आहेत त्यांना त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे ठाणे शहरामध्ये शिस्तबध्द अशी फेरीवाल्यांची व्यवस्था होणार आहे. व त्यामुळे नागरिकांना देखिल जा ये करण्यास अडथळा निर्माण होणार नाही याची देखिल काळजी घेतली जाणार आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यीकरणात भरच पडेल. तसेच महापालिकेच्या उत्पन्नात देखिल वाढ होईल.

पार्किंग प्लाझा व पार्किंग धोरण अंमलबजावणीत सुधारणा या शिर्षकाची घोषणा या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने माझी अशी सूचना आहे की, तेच पार्किंग ठाणे शहरामध्ये ट्रान्सपोर्टच्या गाडया हया शहरामध्ये रस्त्यालगत लावलेल्या असतात. उदा.वागळे प्रभाग, मॉडेल चेकनाका, नितीन कंपनी, तीन हात नाका, सर्व्हिस रोड इ. या ठिकाणी देखिल कोणत्याही

रस्त्यावर कधीही आडव्या तिडव्या गाडया पार्क करण्यांत येतात. त्यामुळे तेथील नागरिक फारच त्रस्त आहेत. त्यांना त्या ठिकाणाहून ये-जा करणे अत्यंत त्रासाचे होत आहे त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊन रोज त्या ठिकाणी वहातूकीची फार मोठी समस्या निर्माण होत आहे. स्थानिक नगरसेवक म्हणून आम्हाला या बाबीचा रोजच त्रास होत आहे व या समस्येला रोज तोंड द्यावे लागत आहे या समस्येचे कायमचे निरोकरण करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिका-यांना या विभागाची पहाणी करुन रोज किती गाडया या ठिकाणी पार्क होतात याचा अहवाल घेऊन या प्रभागातही पे ॲन्ड पार्क घोषित करुन पार्किंग आकार वसुलीची यंत्रणा वेब बेस्ड करण्याची व स्मार्ट हॅंड हेल्ड डिव्हायसेस मार्फत करण्याची योजना प्रस्तावित करण्यांत यावी अशी मी आपणांस विनंती करीत आहे. यामुळे सदर भागांतूनही महापालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे.

ठाणे शहरामध्ये असलेले भाजी मार्केट.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात हाती घेण्यांत आलेल्या बेसमेंट, तळ अधिक दोन मजल्यांच्या गांवदेवी मार्केटचे बांधकाम प्रगतीपथावर असून मार्च २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर इमारतीच्या बेसमेंटमध्ये २५० दुचाकी वाहन पार्किंगची सुविधा असून, तळ मजल्यावर भाजी मार्केट करिता (१५४ स्टॉल व १० गाळे ) व्यवस्था करण्यांत आलेली आहे. पहिल्या व दुस-या मजल्याचा बहुउद्देशीय वापर करण्याचे प्रस्तावीत आहे. या लेखाशिर्षांतर्गत सन २०१३-१४ साठी रु.१.५० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. भाजी मार्केट बांधत असतांना प्रशासनाकडून त्याचे व्यवस्थितरित्या नियोजन होतांना दिसत नाही. कारण भाजी मार्केट बांधून पूर्ण झाल्यानंतर अलॉटमेंट करतांना भाजी विक्रेते व प्रशासनामध्ये मतभेद होतांना दिसतात. ते आपण केलेल्या मंडईमध्ये येण्यास इच्छुक नसतात. त्यामुळे अनेक मार्केटचा आतापर्यंतचा अनुभव आहे की बऱ्याचशा प्रभागातील भाजी मार्केट तसेच पडून आहेत त्यांचा कांहीही उपयोग होत नाही. आपयोग होत नाही. आपल्या महापालिकेने एवढा खर्च करुन सुध्दा त्यातून आपल्याला उत्पन्न मिळत नाही. तरी अशा पडीक भाजी मार्केटचा पाहणी करुन अहवाल घेण्यांत यावा व या ठिकाणी कमिर्शियल गाळे तयार करुन ते अन्य व्यावसायिक स्वरुपात देता येतील का याचा देखिल विचार करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. जेणेकरुन महापालिकेचा खर्च निघू शकेल व या वास्तूचा अन्य कोणाला तरी लाभ होईल.

समारंभ हॉल -

ठाणे शहरामध्ये समारंभ हॉल महापालिकेच्या भूखंडावर बांधलेले असून ते महापालिकेने स्वतः दर वाढवून चालविले तर उत्पन्नात भर पडेल. उदा.लग्न, रिसेप्शन, इतर सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमासाठी स्वतंत्र दर लावून महापालिकेने आपल्या स्थावर मालमत्ता विभागामार्फत हा उपक्रम राबविला तर त्यातून सुध्दा आपल्या महापालिकेला उत्पन्नाचे चांगले साधन उपलब्ध होऊ शकते. या दृष्टीने उत्पन्नाच्या बाजूने आपल्या महापालिकेच्या ज्या काही मालमत्ता आहेत त्याचा पूर्ण सर्व्हे करुन त्या आपल्याला जास्तीत जास्त लोकाभिमुख कशा प्रकारे करता येईल व त्यातून महापालिकेच्या उत्पन्नात कशा प्रकारे भर पडू शकेल या दृष्टीने देखिल प्रशासनाने लक्ष द्यावे.

आम्ही नगरसेवक या महापालिकेचे विश्वस्त आहोत ज्या प्रमाणे खर्च करण्यासाठी आम्ही एखादे काम सुचवितो. त्याचप्रमाणे उत्पन्नाच्या बाजूने देखिल लक्ष देण्याचा प्रयत्न करीत आहोत. कृपया याबाबत प्रशासनाने याकडे गंभीरपणे लक्ष देऊन उत्पन्नाचे स्त्रोत आहेत त्याकडे गांभिर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. तरच आपल्या ठाणे महानगरपालिकेला आपण सद्याच्या बिकट आर्थिक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी पर्याय उपलब्ध होतील. तरी याकडे महापौर महोदय, आपण आयुक्त महोदय आपण देखिल जातीने लक्ष द्यावे व याबाबतच्या सुचना संबंधितांना द्याव्यात. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

जय हिंद जय महाराष्ट्र !

श्रीमती वर्षा पाटील :

महापौर महोदय,मा.उपमहापौर महोदय, मा.आयुक्त,मा.स्थायी समिती सभापती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्षनेते,मा.सभागृहात उपस्थित असलेले नगरसेवक,नगरसेवीका,

मा.आयुक्तांनी व मा.स्थायी समितीमध्ये ठाणे महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा रु.२१६६ कोटीचा मुळ अर्थसंकल्प व २०१३-१४ चा रु.१६४६ कोटीचा सुधारीत अर्थसंकल्पयी अंदाजपत्रक सादर केला हाता. स्थायी समितीमध्ये सदरहू अर्थसंकल्पावर सविस्तर विभागवार विचार करुन आवश्यक ते फेरफार करुन सन १०१३-१४ चा सुधारीत अर्थसंकल्प रु.सहाशे कोटीचा व सन २०१४-१५चा रु.२३५५ कोटीचा मूळ अर्थसंकल्प महासभेमध्ये सादर केला आहे, त्या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करीत आहे.

अर्थसंकल्पामध्ये म्हटले आहे की, जमा आणि खर्च हया दोन बाबीवर अवलंबुन असते. जमा बाजुचा विचार केला तर पुर्वी जकातीपासुन महत्वाचे उत्पन्न मिळत होते. परंतू महाराष्ट्र शासनाने एलबीटी सुरु आणि ठाणे महानगरपालिकेची आवक कमी झाली. महानगरपालिकेची कामे सुरु होती परंतू प्रशासन आणि ठेकेदार यांच्यामध्ये बिल अदा करण्याकीता वाद निर्माण होत होते. प्रत्येक प्रभागवार दुकानाची नोंदणी केली तर त्यावरील उत्पन्नात वाढ होईल.

मालमत्ता कर हा आणखीन महत्वाचा उत्पन्नाचे साधन आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत पुष्कळ अशा इमारती अनधिकृतपणे अभ्या झालेल्या आहेत हया इमारतींना परवानगी नसते. व ओसीसुध्दा नसते. हया इमारतीमध्ये रहिवाशी दोन ते तीन वर्षापुर्वी रहावयास येतात परंतू कर आकारणी करीता उशिरा अर्ज करतात त्यामुळे ते उत्पन्न ठाणे महानगरपालिकेचे उत्पन्न निश्चितच कमी प्रमाणात होते. इलेक्ट्रिक मिटर त्या इमारतींना लावले असतात त्याची प्रत मागितली तर नक्कीच त्यावर कोणत्या वर्षी रहावयास आले याची नोंद मिळेल व उत्पन्नात भर पडेल याची नोंद घ्यावी.

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत मंजूर नकाशाप्रमाणे इमारती बांधलेल्या आहेत परंतू त्याची ओसी घेतलेली नाही अशा इमारतींना सवलतीची योजना राबवुन त्यांना ओसी दिली तर उत्पन्नात भर पडेल.

पुष्कळ इमारतींना वैयक्तिक कर आकारणी करण्यात आली नाही, त्यामुळे कर थकबाकी मोठया प्रमाणात रहाते.सोसायीचे पदाधिकारी वैयक्तिक टॅक्स लावण्याकरीता प्रयत्न करतात, परंतू अधिकारी त्यांच्याकडून जो पहिला घर खरेदीकेले होते त्याची कागदपत्र मागतात ते त्यांच्याकडे नसतात त्यामुळे वैयक्तिक कर आकारणी होत नाही. म्हणून आयुक्त महोदय आपण प्रशासनाला आदेश दिले पाहिजे की जे घरमालक आता रहात आहेत त्यांचे कागदपत्र व सोसायटीचे पत्र ग्राहय धरुन त्यांना वैयक्तिक कर आकारणी करण्यास सांगावे जेणेकरुन उत्पन्नात भर पडेल.

कांही चाळी व झोपडपट्टयांमध्ये १+१ अशी घरे बांधलेली आहेत परंतू कर मात्र तळ मजल्याला लावला आहे. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेचे उत्पन्न बुडते. तरी माझी विनंती आहे की १+१ ला कर आकारणी केली तर ठाणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

ठाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या वास्तु आहेत परंतू कांही वास्तु हया भाडेतत्वावर दिल्या नाहीत, त्यामुळे उत्पन्नात घट होत आहे तरी ठाणे महानगरपालिकेच्या ज्या वास्तु तयार आहेत त्यातील हॉल, दुकाने भाडेतत्वावर दयावे जेणेकरुन उत्पन्नात वाढ होईल.

ठाणे परिवहन सेवा ही सर्वसामान्य नागरीकांची सेवा आहे परंतू ही सेवा सध्या कोलमडली आहे तिला आर्थिक हातभार लावुन चांगली सेवा दयाचे काम ठाणेमहानगरपालिकेने केले पाहीजे. नविन बसेसकरीता बजेटमध्ये भरीव तरतुद केली आहे. परंतू व्यवस्थापकला ट्रान्सपोर्टचा अनुभव अशा अधिका-याला त्याठिकाणी आणणे गरजेचे आहे. पुर्वी श्री.फुटाणे साहेब हे परिवहनचे व्यवस्थापक होते ते एस.टी.मधील अधिकारी होते. त्यांना परिवहन सेवेत व्यवस्थापक म्हणून आणले त्यावेळी त्यांनी चांगले काम केले आणि परिवहनची सेवा चांगल्याप्रकारे सुरु होती. तशाप्रकारचा ज्ञान असलेला एसटी किंवा बेस्टमधील अधिकारी परिवहन सेवेत आणलावा अशाप्रकारची सूचना मी करीत आहे. परिवहन सेवेच्या नविन बसेस येणार आहेत परंतू त्या ठेवण्याकरीता आगाराची व्यवस्था करणे गरजेचे आहे. आता फक्त कळवा आगार आणि वागळे आगार असे दोनच आगार आहेत त्यामुळे पुष्कळ बसेस हया रस्त्यावर पार्क केल्या जातात त्यांची डागडुजी नीट करता येत नाही. तिसरा आगार कोलशेत येथे आहे. त्याठिकाणी गेल्या सात ते आठ वर्षापासुन सडत पडलेल्या बसेस आहेत. त्यावेळी त्यांचा लिलाव केला असता तर परिवहन सेवेला प्रत्येक बसेसमागे दिड ते दोन लाख मिळाले असते परंतू प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे त्या बसेस सडत पडल्या आहत. ठाणे परिवहन सेवेने स्वत: सीएनजी गॅस स्टेशन सुरु केले तर त्यातुन चांगले उत्पन्नाचे साधन निर्माण होईल त्याकरीता कळवा आगार, उपवन आगार,मुंब्रा येथे टीएमटी रिझर्व्ह जागेवर,घोडबंदर रोड येथे रिझर्व्ह टीएमटी जागेवर सीएनजी स्टेशन सुरु केले तर परिवहन सेवेला सुध्दा फायदाच होईल कारण सीएनजी भरण्याकरीता वागळे आगारला जायला नको आणि बाहेरच्या वाहनांना सुध्दा त्याचा फायदा घेता येईल व परिवहन सेवेचे उत्पन्न वाढेल व कामगारांची थकबाकी देणी अदा करता येतील.

तसेच महिला बचत गटांना सक्षम करण्याकरीता अनुदान व प्रशिक्षण दिले जाते परंतू त्या बचत गटांनी उत्पादन केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध केली जात नाही त्यामुळे बचत गट हे व्यवसाय करण्याकरीता पुढे येत नाहीत. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये बचत गटाचा मेळावा व बाजारपेठ अशाप्रकारे वर्षातुन दोनवेळा आयोजित केल्यास बचत गट व्यवसाय करण्यास पुढे येतील तसेच बचत गटांना महापालिकेच्या वास्तुमध्ये उत्पादन करण्यास परवानगी दिली तर त्यांना चांगल्याप्रकारे मदत होणार आहे तसेच बचत गटांना व्यवसाय करण्यास ठाणे महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन दिली तर जास्तीतजास्त बचत गट आपले व्यवसाय सुरु करतील तरी याची नोंद या अर्थसंकल्पात करण्यात यावी. तसेच या बचत गटांमार्फत महापालिकेला आर्थिक फायदा मिळणारच आहे.

तसेच उदयान विभागांसाठी स्थापत्य कामांचा निधी जर प्रभाग समितीवाईज दिलातर प्रत्येक प्रभागातील उदयानातील कामे मार्गी लागतील धन्यवाद. जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.राजेंद्र साप्ते :

महापौर महोदय,सदर अर्थसंकल्पावर मागिल दोन दिवस सविस्तर चर्चा सुरु असुन त्यानुषंगाने मी कांही सूचना करीत आहे. आज संपूर्ण ठाणे शहरात परिवहन सेवेचा विषय खुप गाजत असुन आपली परिवहन सेवा महत्वाचे अंग आहे. मी याठिकाणी एक सूचना करु इच्छीतो की,आपली ही सेवा दुस-या संस्थेकडे किवा बीएसटीकडे वर्ग करण्यापेक्षा ते सुध्दा आपलेच अपत्य आहे असे समजुन आपण सर्वांनी परिवहन सेवेला सक्षम करण्याच्यादृष्टीकोनातून भरीव निधी जर उपलब्ध करुन दिला तर मला वाटते नक्कीच परिवहन सेवा चांगली होईल. तसेच आपल्या ज्या कांही ७०-८० बसेस आहेत त्या एक ते दोन करोड रुपयामध्ये आपल्या ज्या ३०-४० बसेस आहेत त्या चांगल्या सुस्थितीत होतील आणि आपल्या ठाणेकरांना ही बससेवा उपलब्ध होईल.तरी यासाठी सभागृहाने तशी मान्यता दयावी.

त्याचप्रमाणे शिक्षण मंडळाच्याबाबतीत देखिल बोलायचे तर मराठीचा पट कमी होत आहे, तर काही ठिकाणी जो काही झोपडपट्टी विभाग आहे तेथील शाळांचा पट चांगला असल्याचे दिसुन येत आहे. याचे उदाहरण म्हणजे कळवा पुर्व येथील घोलाईनगर येथील मराठी शाळेमध्ये ३७५ विदयार्थी शिक्षण घेत आहेत. परंतू त्याठिकाणी विदयार्थ्यांना वर्गखोल्या कमी पडत आहेत. आपण तेथील इमारतीमध्ये वर वाढीव मजल्यासाठी बांधकाम केलेले आहे. तरी वाढीव माळयाचे जर काम केले तर घोलाईनगरमधील मराठी शाळेचे वर्ग जास्त घेता येतील. तसेच त्या परिसरामध्ये आपण जी हिंदी माध्यमाची शाळा सुरु केली आहे, आज त्याठिकाणी दुप्पट वस्ती ही हिंदी माध्यमाची झाली आहे. जवळजवळ ६७५ पर्यंतचा त्यांचा पट आहे. आयुक्त साहेब आपण याठिकाणी नोंद केली पाहिजे की, त्याठिकाणीसुध्दा जर स्वतंत्र हिंदी शाळा उघडण्याकरीता आपण निधी उपलब्ध करुन दयावा,अशी विनंती आहे. त्याचप्रमाणे माझ्या प्रभाग क्र.२० मध्ये मध्यंतरी दोनवेळा आयुक्त साहेब आले होते त्याठिकाणी त्यांनी पाहणी दौरासुध्दा केला होता,त्याठिकाणी जे आरजीचे प्लॉट आहेत ते आपल्या ताब्यात आले असुन ते आपण विकसित करणेबाबत आपण संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. आयत्यांनी त्यांच्या पाहणीदौ-यामध्ये तेथे हॉस्पीटलकरीता जी उपलब्ध जागा आहे तर त्याठिकाणी आपल्याला एक चांगले आरोग्य केंद्र उभारता येईल व त्यामध्ये डायलेसिस सेंटर किंवा ट्रॉमा सेंटर उपलब्ध करता येईल. व महापौर महोदय आपणसुध्दा याबाबत केंद्र शासन व राज्य शासनाकडे प्रयत्न केलेतर नक्कीच या योजनेचा आपल्याला लाभ घेता येईल व एक भव्यदिव्य हॉस्पीटल उपलब्ध करुन देता येईल.आमचे नवनिर्वाचित खासदार देखिल डॉक्टर आहेत व आता कांही दिवसांनी ते सर्जन होतील. आपल्या आरोग्य विभागाने देखिल खुप परिश्रम घेतले. डॉ.केंद्रे,डॉ.मैत्रा तसेच आयुक्त साहेबांनी स्वतः पाहणी केलेली आहे. सदरची जागा नाशिक मुख्य रस्त्याला जोडुन असल्यामुळे तेथे एक चांगले हॉस्पीटल उभारावे असे मला वाटते.

त्याचप्रमाणे आपल्या महापालिकेला नुकताच एक प्लॉट उपलब्ध झाला आहे. त्याठिकाणी एक चांगले पार्क उभारण्यात यावे असे पाहणी करताना आयुक्तांनीसुध्दा तत्वतः मान्य केले व त्याप्रमाणे त्यांनी निर्देशसुध्दा दिले. आज ठाणे शहरात आमची विलीन झालेली गांवे आहेत ती ग्रामिण भागातील होती. त्याठिकाणी ग्रामिण भागाचे दर्शन व्हावे आणि त्याठिकाणी बारा बलुतेदार ही जी संकल्पना आहे मग तेथे आगरी, सोनार, कासार, लोहार, चांभार अशी जी कांही पुर्वापार परंपरा चालत आली आहे हे कोठेतरी

आपल्या स्मृतीआड होत चालले आहेत तरी ते विस्मृतीत जाऊ नये आणि त्यांची स्मृती जतन करावी यासाठी बारा बलुतेदार अशी संकल्पना मी मांडली व आयुक्तांनीसुध्दा ते मान्य केले तरी त्या जागेमध्ये उदयान उभारण्याकरीता निधीची तरतुद करावी आणि पारसिकनगर बारा बलुतेदार उदयान अशी जी जागा आहे त्याठिकाणी आयुक्तांनी सुचविले की सदर ठिकाणी एका नामांकित व्यक्तीचे नांव दिले पाहिजे, तरी स्थानिक नगरसेवक म्हणुन मी या सभेत सुचवू इच्छितो की ठाण्याच्या या संपूर्ण जडणघडणेमध्ये विकासामध्ये धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचे खुप मोठे योगदान आहे,सर्व जातीधर्माची माणसे असुदे किंवा सर्व क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते आणि आज येथे असलेले सभागृहातील सर्व नगरसेवकदेखिल यांचे धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्याविषयी प्रेम आणि आस्था होती त्यांचे ठाणे शहरावर प्रेम होते,तरी हे जे उदयान आपण करत आहोत त्याला धर्मवीर आनंद दिघे पार्क असे नामकरण केल्यास त्यांना उचित अशी श्रध्दांजली ठरेल.त्याचप्रमाणे पारसिकनगर येथे ६० मीटरचा जो भव्यदिव्य रस्ता झाला आहे तेथील सुध्दा आयुक्तांनी पाहणी केली आहे व त्याठिकाणी एक जॉगिंग पार्क करण्याबाबत निर्देश दिले होते. तरी जॉगिंग पार्ककरीता या अर्थसंकल्पात विशेष बाब म्हणुन किमान दोन कोटीची तरतुद केली तर त्याठिकाणी पार्क होऊ शकेल व त्याचा लाभ सदर ठिकाणी राहत असलेल्या वृध्द,नागरीक,महिला यांचेसाठी क्रीडा साहित्य देखिल आपल्याला उपलब्ध करता येईल.

त्याचप्रमाणे प्रभागामध्ये उपलब्ध असलेल्या ज्या काही जागा आहेत,आपल्या जे कांही सुविधा भूखंड मिळाले आहेत त्याठिकाणी देखिल बहुउद्देशिय इमारत व्हावी म्हणून मी प्रस्तावाची सूचना दिली होती त्यास महासभेने मान्यता दिली होती तरी सदर इमारतीकरीता निधी उपलब्ध करावा. तरी या सूचना मांडुन मी आपली रजा घेतो.जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.हिरा पाटील :

महापौर महोदय, आज ठाणे महापालिकेने वार्षिक बजेट २३५५ कोटीचा जो मांडला आहे. हया बजेटबद्दल आम्ही चर्चा करताना आमच्या विरोधी पक्षनेते यांचेकडून कांही सूचना आल्या की , बजेटच्या भाषणावर बोलत असताना जमा आणि खर्चाबाबतसुध्दा बोला. महापौर महोदय, जमेबाबत प्रत्येकाच्या अपेक्षा असतात परंतू खर्चाचा विषय आल्यानंतर आपण बजेटमध्ये पाहतो की जेवढी आपण तरतुद ठेवली आहे तितकाच आपण स्पिलओव्हर दाखविला आहे. आमच्यासारख्या नविन नगरसेवकांचे तर हालच आहेत कारण आम्हाला नेहमीच तुमच्याकडुन भिक मागुन बजेट घ्यावे लागते. कारण जेव्हा आम्ही अधिका-याकडे जातो त्यावेळी स्पिलओव्हरचा विषय काढुन आमचे तोंड बंद केले जातात. तरी मला याठिकाणी कांही सुचवायचे आहे की, खर्च आपण टॅक्स तसेच जकातरुपाने घेत असतो आणि ज्यावेळी खर्च जेव्हा जमा होतो त्यानंतर आपण खर्च करतो. जमेची बाजु आज शहरविकास महसुल उत्पन्न आपण जवळजवळ ७३ टक्के दाखविले आहे. आणि अनुदाने ही १३ टक्के आणि कर्ज १४ टक्के दाखविले आहे. बजेटवर बोलत असताना मला महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करायचे आहे. आपल्याकडे जे मोठमोठे प्रपोजल होतात त्यामध्ये सिंहाचा वाटा आहे हे विसरता कामा नये. या सभागृहामध्ये जेव्हा नगरसेवक म्हणुन आम्ही बोलत असतो मी आपल्याला जमेच्या बाजुवर एक उदाहरण देतो. महापौर महोदय माझ्या सेक्टर ११ मध्ये कमीतकमी सव्वाकरोडचे काम चालु आहे. यातुन आर्थिक उत्पन्नसुध्दा

आज खुप मिळत आहे. त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे होतात याबाबत ठाणे महापालिकेमध्ये बोंबाबोंब असते परंतू त्याचबरोबर अधिकृत जी कामे आहेत याबाबत सातत्याने दुर्लक्ष होत आहे. आज यापेक्षा जास्त कशी होतील याकडे प्रशासनाचे पुर्णपणे दुर्लक्ष होत आहे. आज २७-२८ वर्षे झाली ठाणे महापालिकेच्या प्रभाग सेक्टर ११ मध्ये एकही रस्ता डीपीप्रमाणे केलेला नाही. आज आमच्या दिव्यामध्ये जात असताना जो रस्ता आहे त्या रस्त्याबाबत आम्ही नेहमी ओरड करतो परंतू आम्हाला उत्तर दिले जाते हे काम पीडब्ल्युडीच्या हातामध्ये आहे. परंतू आपण तो रस्ता त्यांचेकडुन कां घेत नाही? घोडबंदर आणि सेक्टर ११ मध्ये एकाचवेळी गावे समाविष्ट करण्यांत आली आहेत. आज घोडबंदरचे नंदनवन होत आहे. ठाण्याचे नंदनवन होत आहे परंतू ग्रामिण भागाकडेसुध्दा लक्ष देणे आवश्यक आहे. घोडबंदर येथे पाहिल्यास चारपदरी रस्ते, पाच पदरी रस्ते, नाटयगृह आहे असुदे, तेथील सुध्दा बंधु हे माझेच आहेत, परंतू आमच्या सेक्टर ११ मधील सुध्दा नागरीक हे आपलेच ठाणेकर आहेत याचा आपल्याला विसर पडत आहे. नविन एखादी कोणती स्किम आली की बोंबाबोंब होते, भरती आली की रांग लागते, मी आपल्या निदर्शनास आणुन देतो की, स्थानिक जो भूमिपुत्र आहे त्याला ठाणे महापालिकेमध्ये कोणत्याही प्रकारचा मान मिळत नाही. आज तुम्हाला कोणतीही विकासाची कामे करताना यांच्या जमिनी घ्याव्या लागतात , स्थानिक लोकांच्या जमिनी घेतल्याशिवाय आपण रस्ता करु शकत नाही. आज याठिकाणी मोठमोठे आकडे सांगुन अर्थसंकल्प सादर केला जातो. पैसे येतात व ते संपुनसुध्दा जातात परंतू आमच्या वाटयाला कांहीच येत नाही. आज २५ वर्षापुर्वीचे आरक्षण जसेच्यातसेच आहे. मग ही आरक्षणे कशासाठी टाकली आहेत. आमच्या वाडवडीलांनी ज्या जमिनी ठेवल्या होत्या त्या आमच्यासाठी होत्या, परंतू सामाजिक सुविधांसाठी तुम्ही त्या घेतल्या असतील तर त्याचा उपयोग करुन घ्या. आणि नसेल तर त्या शेतक-यांना परत करा. आज शेतक-यांना कमविण्याचे कोणतेच साधन नाही. आमचे जे वडीलधारी होते ते जमिनीला आपली आई म्हणत म्हणुन त्यांनी आतापर्यंत जमिनी विकल्या नव्हत्या. आज आमचा समाज शिक्षणापासुन जरी कमी असला तरी भावाने, मनाने आमचा समाज आज अत्यंत पुढारलेला आहे हे मी अभिमानाने सांगु शकतो. महापौर महोदय मागच्या बजेटमध्ये सुध्दा मी कांही सूचना दिल्या होत्या. परंतू त्या सूचनांची जर अंमलबजावणी होत नसेल तर त्याबाबत आम्ही येथे बोलुन तरी कांय उपयोग? आज आमच्याकडे तुम्ही रस्ते, लाईट, पाणी दया. जी ठाणे महानगरपालिकेची जमा बाजु आहे त्यामध्ये पुढील वर्षी किमान १०० करोड वाढतील अशी मला आशा आहे. आजच्यातारखेला पैशाची किंमत खुप कमी झाली आहे. आज प्रत्येकजण चांगले राहण्याचे स्वप्न पाहतो आणि चांगले राहण्याचे प्रयत्न करतो. आज करोडो रुपये खर्च करुन एखादा नागरीक घर घेतो परंतू त्या घरापर्यंत जायला चांगला रस्ता नसेल तर कोणत्याप्रकारची डेव्हलपमेंट होणार नाही. आज तेथील नागरीकांना रस्ते, लाईट, पाणी या तीन सुविधातरी प्रामाणिकपणे देण्याचा प्रयत्न करावा जेणेकरुन तेथुन आपल्या जमेत वाढ होईल. आज आमच्या नागरीकांवर किती अन्याय होत आहे हे सांगण्याची गरज नाही. ठाण्यामध्ये डंपिंगचा जो कचरा जमा होतो तो सुध्दा आमच्या गावामध्ये टाकला जातो. आमचा विभाग हा फक्त कचरा टाकण्यासाठी आहे कां? तुम्हाला डोळे नाहीत कां? तुम्हाला खाडीमध्ये कचरा टाकण्यासाठी खाडी दिसते मग तेथुन जाताना तो रस्ता दिसत नाही कां? तरी त्या रस्त्याचे काम करण्यात यावे. जेव्हा हया गोष्टी केल्या जातील त्यावेळी तेथे डेव्हलपमेंट चालु होईल व त्याने शहरविकासामार्फत पैसे जमा होतील. तेथे जेव्हा नवनविन संकुले तयार होतील त्यावेळी टॅक्सरुपाने आपल्याकडे पैसे जमा होतील. आज मुंब्रा शहर पुर्णपणे भरलेले आहे. सेक्टर १० व ११ हे पुर्णपणे ओपन प्लॉट आहेत. आपल्याला जर जमेची बाजु वाढवायची असेल तर शहरविकासाच्या

माध्यमातुन डीपीमध्ये रोड करणे अत्यंत आवश्यक आहे. महापौर महोदय मला प्रामाणिकपणे सुचवायचे आहे की, ठाण्याच्या वकासामध्ये प्रशासनाने कधीच कमी केले नाही. परंतू जी चुकीची कामे होतात, ज्या चुकीच्या फाईली बनल्या जातात, या फाईलींवर अंकुश ठेवलातर किमान दोनशे कोटी रुपये आपले वाचु शकतील. प्रत्येक नगरसेवकाला वाटते की माझ्या प्रभागामध्ये जास्तीतजास्त कामे व्हावीत. परंतू आमचे एवढेच स्वप्न आहे की २८ वर्षाने एकदातरी कामे व्हावीत. ठाणे शहरातील माझे नगरसेवक याठिकाणी बसले आहेत त्यांना विचार करावा लागतो की आता नगरसेवक निधी कोठे वापरायचा म्हणुन. ठेकेदार अणि नगरसेवक याबाबत चर्चा करतात की हा निधी कोठे वापरायचा म्हणुन. मग अशावेळी अमुक एक रस्ता चार वर्षापुर्वी केला होता तो खराब झाला आहे तरी हा निधी तेथे वापरुन टाका असे प्रकारसुध्दा होत असतील होत आहे असा मी आरोप करीत नाही. परंतू माझ्या विभागामध्ये २५ वर्षामध्ये पहिल्यांदाच काम होणारे असे कित्येक रस्ते आहेत परंतू सदर ठिकाणी येण्यासाठी अधिका-यांना वेळ मिळत नाही, त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतुद ठेवली जात नाही. माझ्या वॉर्डातील फडकेपाडा कॉलेज असुन त्याठिकाणी एक शासकीय तंत्र निकेतन आहे आज तेथुन अनेक विदयार्थी डिग्री घेऊन बाहेर पडतात, परंतू त्या निकेतनमध्ये जाण्यासाठीसुध्दा चांगला रस्ता नाही.

महापौर महोदय, आमच्या वॉर्डात पाण्याचा प्रश्न आहे, पाण्यासाठी तर आमची भीक मागण्यासारखी परिस्थिती होते. आज याठिकाणी तिसरे बजेट सादर होत आहे परंतू अदयाप आमच्या वॉर्डातील पाण्याचासुध्दा प्रश्न सुटलेला नाही. पाण्यासाठी आम्ही जगदाळे साहेब, तसेच आयुक्तांकडे गेलो होतो, अधिकारीवर्ग तर असे गोलगोल फिरवतात की पुढे मार्गच बंद होतो. पाण्याबाबत मी एक सूचना करु इच्छितो की, पाण्याकरीता जी तरतुद करण्यांत आली आहे त्या तरतुदीमधुनसुध्दा पाणी खात्यामध्ये जमा होऊ शकते. आज अनधिकृतपणे नळ कनेक्शन जोडले जातात तेव्हा साहजिकच कल्व्हर्टच्या बाजुने असलेल्या गटारातुन ते नळ कनेक्शन घेतात, व हे कनेक्शन घेताना कालांतराने तेथील एक दोघांचे नळ कनेक्शन तुटले जातात व अशावेळी जेव्हा दुषित पाणी आमच्या प्रभागामध्ये येते व हा विषय अधिका-यांकडे घेऊन आल्यानंतर अधिकारी स्पष्टपणे सांगतात की ही लाईन बदलावी लागेल. आज ठाणेकरांचा हा पैसा जो अनधिकृतपणे नळ कनेक्शन घेतो व त्याला तुमचा लगाम नसल्यामुळे अशी कामे केली जातात. माझे एवढेच म्हणणे आहे की, नविन लाईनकरीता खर्च करण्यापेक्षा अनधिकृतपणे जो नळ कनेक्शन घेतात त्यांचेवर दंडात्मक कारवाई करावी जेणेकरुन यावर आळा बसेल.

महापौर महोदय, आपल्या ठाणे महानगरपालिकेची परिवहन सेवा म्हणजे एखादयाचा अपघात होऊन जो जखमी होतो व त्याला रुग्णालयात नेताना त्याच्या आजुबाजुला हॉस्पीटलचा जो स्टाफ असतो ते जे चित्र असते तशी परिस्थिती परिवहनची झालेली आहे. आज परिवहनच्या २२२ बसेस चालत आहेत. या २२२ बसेसना आमच्या नजरेमध्ये २२२ ड्रायव्हर असतील व तेवढेच कंडक्टर असतील आणि दुरुस्तीसाठी कांही स्टाफ असेल. परंतू आपल्याकडे २२२ बस चालविण्यासाठी २२९९ कर्मचारी आहेत. परंतू एवढा स्टाफ काय करतो? आज ठाण्याची जनता जी टॅक्स भरते हा जो पैसा जमा होतो परंतू त्याचे आर्थिक दुबळेपणाचे काम परिवहन समितीकडुन होत असते. आज आपण पहातो की एखादयाने सुमो घेतली की कालांतराने त्याच्याकडे मिनी टेंपो येतो म्हणजेच साध्या सुमोवाल्याला इन्कम होते तर आपल्या बसला कां इन्कम होत नाही? आज आमच्या मुंब्रा येथे जाणा-या बसेसमध्ये जागा मिळत नाही. मग एवढया बसेस

असुन त्याचा उपयोग काय? जर परिवहन सेवा सुविधा व्यवस्थित देत नसेल तर ती बीएसटीला देण्यांत यावी.ठाणेकरांचा पैसा का लुटण्यात येत आहे?

महापौर महोदय, आज छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पीटल म्हणजे नाव मोठे लक्षण खोटे असल्यासारखे आहे. हया हॉस्पीटलमधुन आपण चार करोड रुपये कमवतो. परंतू ६२ करोड रुपये हे खर्चामध्ये दिसतात. राजीव गांधी वैदयकिय विदयालय १ कोटी १३ लाख जमेमध्ये आहेत व ३२ कोटी ६८ लाख हे खर्चामध्ये आहेत. मी याठिकाणी जेवढे समजते तेवढे बोलण्याचाप्रयत्न करीत आहे. आज याठिकाणी महिला भगिनी आहेत त्यांना माहित आहे की घर कसे चालवायचे असते ज्यावेळी एखादया महिलेचा पती हा आर्थिक रक्कम घरी देतो त्यावेळी घरातील महिला त्या पैशाचे व्यवस्थितरित्या नियोजन करत असते. महापौर महोदय आज आपण ३४ टक्के कर्ज घेत आहोत अशावेळी राजीव गांधी महाविदयालय तसेच कळवा हॉस्पीटल हे चोचले कशाला पाहिजेत? हे शासनाकडे देण्यात यावे, आपल्या ठाणेकराचा पैसा त्यामध्ये वाया का घालवत आहात? प्रत्येक माणसाला वाटते की सर्वांत जास्त दानशुरपणा करावा,सर्वात जास्त चांगली कामे मी करावीत. परंतू जेव्हा खिशातील पैसे संपविण्याचा विषय येतो त्यावेळी या गोष्टीला कोठेतरी आळा बसतो. आज मलासुध्दा वाटते की महापौरांसारखा माझा बंगला असावा. परंतू मला माहित आहे की महापौरांइतके माझे उत्पन्न नाही. आज महापौरांचा व्यवसाय आहे. मी तर असे स्वप्न बघुन उपयोग नाही. मला प्रथम माझ्या परिवाराकरीता किती खर्च करायचा आहे हे पहायचे आहे. ठाणे महापालिका हा आपला एक परिवार आहे. तरी माझे सांगण्याचे तात्पर्य म्हणजे हा जो नाहक खर्च आहे तो कोठेतरी बंद होणे आवश्यक आहे. तुमचे उदाहरण देण्याचे कारण आपण एक सत्कारमुर्ती आहात आदरणीय आहात. तुमच्यामागे आमचे पाच पांडव आहेत. पांच पांडव म्हणजे गटनेते, विरोधी पक्षनेते,सभागृह नेते जे आमच्या गटमिटींगपुर्वी कांही गोष्टी हया वेळ जाऊ नये म्हणून नगरसेवकांच्यावतीने पुढाकार घेऊन चांगल्या कामामध्ये नेहमीच योगदान तेआमचे पांच पांडव. पांडवांनी वाईट काम हे कधीच केले नाही. महापौर महोदय, ज्या ग्लासात तुम्ही पाणी पिता त्या ग्लासामध्ये जर तुम्हाला विचारले की हा ग्लास पाण्याने किती भरलेला आहे त्यावेळी तुम्ही सांगाल की अर्धा ग्लास पाण्याने भरला आहे परंतू मी सांगेन की पुर्ण भरला आहे कारण त्या ग्लासामध्ये अर्धे पाणी आणि अर्धी हवा आहे प्रत्येकाचा बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. महापौर महोदय आपल्याला कळकळीची विनंती आहे की, मी मागच्यावर्षी नगरसेवक निधी देण्याबाबत अधिका-यांना सांगितले होते. आपल्याकडे जमा जर येत नसतील तर आपला खर्च कोठेतरी कमी होणे गरजेचे आहे. ठाण्यातील जनतेसाठी खर्च करणे आवश्यक आहे व तो करावाच लागणार आहे परंतू वायफळ खर्च जो होत आहे त्यावर आळा बसणे आवश्यक आहे. मी एक उदाहरण देता की, माझ्या शिळ या गावामध्ये गटार बांधायचे आहे एस्टीमेट केल्यास त्याचा खर्च येतो ८० लाख परंतू संबंधित अधिकारी सांगतात यासाठी फक्त १० लाखच घ्या. ठिक आहे मी दहा लाखाचे काम करतो,पुढील वर्षी दहा लाखाचे काम काढतो परंतू जेव्हा पावसाळा येतो त्यावेळी असे लक्षांत येते की, हे जे काम केले आहे तर या गटारातुन पाणी बाहेर जातच नाही. माझे अशी मागणी आहे की पुर्ण ठाण्याचा लेव्हलवाईज सर्व्हे करण्यात यावा. कारण असे न केल्याने आज आपला गटारामध्ये पैसा वाया जात आहे. माझ्या प्रभागात जंगलामध्ये नाले बांधण्यांत आले आहेत या नाल्यातील पाणी तेथील घरामध्ये जाते व उरलेले पाणी वाट काढत नंतर खाडीमध्ये जाते. ही कामे जनतेच्या हिताची असली पाहिजेत ठेकेदारांच्या हिताची नसावीत. माझ्या प्रभागात जे मोठे नाले आहेत ते वरच्यावरच आहेत आणि ते खाली आल्यानंतर सर्व लोकांची बोंबाबोंब होते. शिळफाटा येथील नाल्याचे उदाहरण सांगतो तेथे पाच ते सहा वर्षापुर्वी हे काम

करण्यांत आले होते. नाला बांधत असताना अधिकारी आणि ठेकेदार यांना एवढेतरी ज्ञान असायला पाहिजे की, गटार हे नेहमी खालुनच जाते. परंतू त्या विभागामध्ये जो नाला बांधण्यात आला आहे तेथे डिपच कोणतीच खोदली नाही. जमिन व नाल्याची लेव्हल सारखी आहे. आता प्रश्न येतो तो म्हणजे एस्टीमेट केलेले आहे परंतू बिल काढायचे आहे तर काय करणार नाला वर केला जातो व रस्त्यापेक्षा नाला पाच फुट वर केला जातो. तरी ते काम पुर्णपणे वाया गेले आहे. म्हणून सर्व्हे करुन लेवलींग करुन घ्या.जेणेकरुन नियोजनबध्द काम होतील. तसेच बजेट येते कधी आणि जाते कधी हे समजतच नाही. आम्हाला कधीच बजेट मिळत नाही. फक्त जे जेष्ठ व श्रेष्ठ आहेत त्यांच्यासाठीच बजेट उपलब्ध असते. आज इतके स्पीलओव्हर दाखविल्यानंतर जमामध्ये जे दाखवत आहात ते ऑलरेडी तुम्ही देण्याचे कबुल केले आहे असे असेल तर कामे कोठुन करणार?

दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृहामध्ये इतके गाळे आहेत की त्यातुन आपल्याला मोठया प्रमाणात उत्पन्न मिळाले पाहिजे. येथुन आपल्याला ६० ते ६५ लाख उत्पन्न मिळत असुन खर्च जास्त प्रमाणात आहे. आज जे टोपली घेऊन बसतात ते सुध्दा महिन्याला तीन ते चार तेथील जे भाई असतात त्यांना हप्ते देतात आणि आपले एवढे गाळे आहेत परंतू त्याचे आपण मार्केटींग करु शकत नाही.

जाहिरात विभागाकरीता आपल्याकडे कोणता स्टाफ आहे हे समजत नाही. २५ ते ३० फुटाचे जे होर्डींग्ज लावले जातात तरी त्यांचेकडुन आपल्या महापालिकेला फायदा होऊ शकतो. परंतू याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एका होर्डींग्जसंदर्भात मी संबंधित विभागाकडे पत्र दिले असता त्यांचेकडुन उत्तर येते की हे लिगल आहे म्हणुन. परंतू ती जागा शासनाची आहे.तसेच ती जागा रस्त्यामध्ये येते. ज्यावेळी होर्डींग्जचे प्रपोजल येते त्यावेळी अट टाकण्यात यावी की नकाशाचा सर्व्हे झाल्याशिवाय कोणतीही परमिशन मंजुर करु नका.

अतिक्रमण विभागामध्ये जेव्हा एखादे पत्र दिल्यास त्यावर कोणतीच कारवाई होत नाही हे माझ्र यापेक्षा दुसरे कोणीच सांगू शकत नाही. या विभागाकरीता २ कोटी ८० लाख जमा करण्यांत आले आणि खर्च २२ कोटी आहे.तरी यावर कोठेतरी नियंत्रण असणे गरजेचे आहे. आपल्या ठाणेकरांचा पैसा आपण अशाप्रकारे वायफळ खर्च करत आहात?

समाजविकास विभागाकरीता ३१ कोटी दाखविण्यात आली आहेत. सामाजिक कामे केली पाहिजेत.

प्रदुषण नियंत्रण विभागाला कांहीच कामे दिसत नाही. या विभागाकरीता ६३ लाख जमा दाखविण्यांत आले आहेत. आणि खर्च जातो २ कोटी १४ लाख. परवा माझ्या प्रभागामध्ये सिलेंडरचा स्फोट होऊन त्यामध्ये एक माणुस मृत्युमुखी पडला तसेच तीन माणसे ही गंभीर अवस्थेत आहेत. त्या विभागामध्ये पाण्याचे जे प्रदुषण होत आहे परंतू तेथे आपले अधिकारी जातच नाहीत. तेथे जे नियमबाहय काम चालु असेल तर त्यांना नोटीस लावा त्यांचेकडून दंड वसुल करा. तरी संबंधित विभगातील कर्मचा-यांना सदर ठिकाणी जाण्याकरीता आदेश देण्यांत यावेत.

आज याठिकाणी मी माझ्यापरिने कांही व्यथा मांडल्या. महापौर महोदय मी सांगितलेल्या कामांपैकी दहा टक्के जरी कामे झाली तरी मी तुमचा आभारी राहीन. व तसा आपण मला शब्द दयावा. माझ्या प्रभागात प्रामुख्याने रस्ता, पाण्याची सोय, लाईट आणि तेथे जे आरक्षित भूखंड आहे ते ताब्यात घ्यावेत जेणेकरुन तेथे डेव्हलपमेंट चालु होईल व त्यायोगे करोडो रुपये आपल्या तिजोरीत जमा होतील. तरी मी सांगितलेली कामे केली जातील अशी आशा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद जयमहाराष्ट्र.

मा.महापौर :

आजची खंडीत सभा शनिवार दि.१९.०७.२०१४ रोजी सकाळी ११.३० वा. बजेटवर चर्चा करण्याकरीता आयोजित करण्यांत येत आहे.

तदनंतर मा.महापौर सो. सभा खंडीत झाल्याचे घोषित करतात.

सही/-
श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

( सौ.छाया प्रकाश मानकर )
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,

ठाणे महानगरपालिका,ठाणे.

दिनांक १७ जुलै २०१४

सभा खंडीत झाल्याची वेळ दुपारी २.३० वाजता